# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 4536 /शि.वि./२०१५
दि.25/०६/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व उर्दू प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :-  रमजान महिन्यानिमीत्त उर्दू माध्यमाच्या शाळा अर्धा दिवस भरविण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की , दि. १९.०६.२०१५ पासून पवित्र रमजान महिना सुरु होत असून या महिन्यात दरवर्षी सर्व उर्दू शाळा सकाळपाळीत भरतात. या महिन्यात सर्व विद्यार्थी व शिक्षक रोजे (उपवास) करतात. हे खुप कठीन कार्य असल्याने सर्व उर्दू शाळांना रमजान महिन्यात अर्धा दिवस शाळा भरविण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती अनेक मुख्याध्यापकांनी केली आहे. उपरोक्त महिन्यात विद्यार्थ्यांचे अर्ध्या दिवसाचे होणारे शैक्षणिक नुकसान त्याच्या पुढील महिन्यात दररोज एक तास ज्यादा वर्ग घेवून भरुन काढण्यात येईल असे मान्य केले आहे.

तरी सर्व उर्दू शाळा रमजान महिन्यात अर्धा दिवस भरविण्यात याव्यात. विद्यार्थ्यांचे अर्ध्या दिवसाचे होणारे शैक्षणिक नुकसान पुढील महिन्यापासून दररोज एक तास ज्यादा वर्ग घेवून भरुन काढण्यात यावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT